# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३८१-२०२४** **दिनांक :- १४/१०/२०२४**

## "घरफोडी करणाऱ्या आरोपीतास १२ तासाचे आत अटक करुन, गुन्हा उघडकीस आणुन, एकुण- ४,१६,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश."

दि.२७/०९/२०२४ रोजी सकाळी ०८:३०वा. ते १५:३०वा. दरम्यान तक्रारदार नामे वय-४० वर्षे, यांचे राहते घराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे मुख्य दरवाजाच्या खिडकीवर ठेवलेल्या चावीचे सहाय्याने लॉक उघडुन, त्यावाटे आत प्रवेश करुन एकुण- ४,३८,०००/- रु.किं.चे सोन्याचे दागिने चोरी करुन घरफोडी चोरी केली आहे. सदर बाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पो.ठाणे गु.रजि.नं. I ७२०/२०२४, भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम- ३३१(३), ३०५(ए) प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा मौल्यवान सोन्याचे दागिन्यांची चोरीस संदर्भात असल्याने, मा.वरिष्ठांनी गुन्हयाची उकल होण्याचे अनुषंगाने सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने नमुद गुन्हयाचे घटनास्थळी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी भेट देवुन, तपास सुरु केला. नमुद गुन्हयातील तक्रारदार व साक्षीदार यांच्याकडुन मिळालेल्या माहितीवरुन व घटनास्थळालगत असलेल्या सी.सी.टि.व्ही. कॅमेरांची पडताळणी केली असता, त्यामध्ये तक्रारदार यांची मोठी बहिणीचे जावई श्री. इरफान अब्दुल गणी काझमी, वय-३० वर्षे, हा गुन्हा घडतेवेळी आल्याचे दिसुन आल्याने, नमुद इसमावर संशय बळावल्याने, त्याचेकडे कसुन व कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, त्यास प्रस्तुत गुन्हयात अटक करण्यात आली. नमुद आरोपीताकडे कौशल्यपुर्वक तपास करुन, त्याचेकडून- **एकुण- ५७.०० ग्रॅम** वजनाचे **सोन्याचे दागिने**, असे **एकुण-४,१६,१००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोलीस उप निरीक्षक/अविनाश हाटखिळे, शिवप्रशांत कोंडेवाड, पोहवा/सचिन लोखंडे, विशाल लोहार, संदिप शेरमाळे, पोअं/मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, उत्कर्ष सोनवणे यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

-----ooo-----